# पुस्तक सूची
## २०१७-१८

VISHWAKARMA PUBLICATIONS VP

# विश्वकर्मा पब्लिकेशन्स

मराठी । इंग्रजी । हिंदी




























# अंतरंग

बेस्टसेलर... / १–२

चरित्र – आत्मचरित्र... / ३–४

माहितीपर ... / ५

व्यवस्थापनशास्त्र... / ६

व्यक्तिमत्त्व विकास... / ७

कथासंग्रह... / ८–९

कादंबरी... / १०

आध्यात्मिक ... / १०

हिंदी... / ११

आगामी... / ११–१२

# भूमिका मनातली...

सस्नेह नमस्कार,

समस्त मराठी वाचकांसाठी '**सकस साहित्य आणि दर्जेदार पुस्तक निर्मिती**' हे ब्रीद सत्यात रुजवण्यासाठी सन २०१३ मध्ये **विश्वकर्मा पब्लिकेशन्स**ने मराठी व इंग्रजी पुस्तक प्रकाशन क्षेत्रात पदार्पण केले. मागे वळून पाहताना आजपर्यंतच्या वाटचालीत अवघ्या तीन वर्षांत आम्ही विविध विषयांना स्पर्श करणारी, अभ्यासपूर्ण व सकस साहित्यमूल्ये असणारी मराठी व इंग्रजी भाषेतील दीडशेहून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. यामुळेच साहित्य क्षेत्रातील जाणकारांनी आमची विशेष दखल घेतली आहे, जागतिकीकरणाच्या प्रवाहात आजची कुटुंबव्यवस्थासुद्धा वेगाने बदलत आहे. याच जाणिवेतून 'कुटुंबाला' केंद्रस्थानी ठेवून कुटुंबातील प्रत्यकाचे दैनंदिन जीवन अधिक सुकर व आनंददायी करणारी उपयुक्त पुस्तके 'विश्वकर्मा'ने आजवर केली आहेत.

'**सुजाण वाचक**' हेच आपले शक्तिस्थळ आम्ही मानले असल्याने वाचकाला अधिक समृद्ध व अद्ययावत साहित्य उपलब्ध करून देणे, ही आमची जबाबदारी आहे, हेही प्रांजळपणाने आम्ही कबूल करतो. चरित्र, व्यवस्थापनशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास, कथासंग्रह, कादंबरी, आरोग्य, आध्यात्मिक, माहितीपर या विषयांवरील पुस्तके प्रकाशित करून, आपले वेगळेपण सिद्ध करून वाचकांच्या पसंतीस आम्ही उतरलो आहोत. त्या त्या विषयातील तज्ज्ञ, अभ्यासक व जागतिक पातळीवर गौरवलेल्या लेखकांनी आपले लेखन विश्वकर्माकडे प्रसिद्धीस सोपवले, हा आम्ही आमचा गौरवच समजतो.

इंग्रजी भाषेतील गाजलेल्या, अभ्यासपूर्ण आणि उपयुक्त पुस्तकांचा मराठी भाषेत अनुवाद करून वाचकाला जागतिक साहित्याची ओळख करून देण्याचे काम आम्ही यापुढेही असेच अखंड सुरू ठेवणार आहोत.

'विश्वकर्मा'ला अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाने उत्कृष्ट साहित्य निर्मिती व पुस्तक निर्मितीचा महत्त्वपूर्ण पुरस्कार देऊन आमच्या आजवरच्या कार्यावर जणू शिक्कामोर्तबच केले आहे.

सकस साहित्य, उच्च दर्जाची निर्मिती व माफक मूल्य यांमुळेच आजवरच्या वाटचालीत राज्यातील सुजाण वाचकांचा आम्हाला कायमच वाढता प्रतिसाद मिळाला आहे. हे पाहून आगामी काळातदेखील साहित्य व प्रकाशन क्षेत्रात अधिक भरीव काम 'विश्वकर्मा'कडून निश्चित घडेल, याची आम्ही शाश्वती देतो.

**विशाल सोनी**
मुख्य कार्यकारी अधिकारी
विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे



## द कलाम इफेक्ट - पी. एम. नायर, अनुवाद : डॉ. मीना शेटे - संभू

**पुस्तकाविषयी :**
पी. एम. नायर यांना माजी दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. या प्रवासात त्यांना डॉ. कलाम यांच्या वैयक्तिक तसेच कार्याविषयी ओझरते दर्शन घडले. जे त्यांनी मांडले आहे, ते वाचकासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-33-5
Price- Rs. 150/-
No. of Pages- 128



## स्वप्नं पहा... उघड्या डोळ्यांनी! - रॉनी स्क्रूवाला, अनुवाद : धनश्री बेडेकर

**पुस्तकाविषयी :**
उद्योजक म्हणजे काय? उद्योजकासाठी अत्यंत महत्त्वाचे गुण आणि अवगुण, नियोजनाचे महत्त्व, समस्यांना आणि अपयशाला सामोरे जाण्याचा दृष्टिकोन. संघबांधणीची प्रक्रिया, व्यवसायात प्रवेश करण्यापासून ते व्यवसाय सोडण्याचा निर्णय कसा, कधी, घ्यावा की नाही अशा असंख्य प्रश्नांच्या उत्तरांसाठी निश्चित वाचा स्वप्न पहा...उघड्या डोळ्यांनी आपल्याला उद्योजकतेचे धाडस करण्यासाठी आत्मबल देणारे आणि या धाडसास एका यशस्वी प्रवासात बदलण्यासाठी मार्गदर्शन करणारे पुस्तक.

Year of Publication- 2016
ISBN- 978-9385665-03-5
Price- Rs. 250/-
No. of Pages- 280



## नेताजींच्या मृत्यूचे गूढ भारताचे सर्वांत मोठे रहस्य - अनुज धर, अनुवाद : डॉ. मीना शेटे-संभू

**पुस्तकाविषयी :**
दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान, आग्नेय आशियात कुठेतरी सुभाषचंद्र बोस यांचा कथित विमान अपघातात झालेला मृत्यू हे अद्यापही गूढ बनून राहिले आहे. – अमिताभ बच्चन, ३१ जुलै २०१२ रोजी केलेले ट्विट.
बोस यांच्या मृत्यू झाल्याच्या दाव्याविषयीच्या कित्येक व्यापक समजुतींविषयी हे पुस्तक प्रश्नचिन्ह उपस्थित करते. – टाइम्स ऑफ इंडिया

Year of Publication- 2016
ISBN- 978-9383572-86-1
Price- Rs. 650/-
No. of Pages- 536




## इनोव्हेशन आईनस्टाईनच्या नजरेतून- वीरेंदर कपूर, अनुवाद - तृप्ती जाधव

**पुस्तकाविषयी :**
अल्बर्ट आईनस्टाईन हे मागील शतकातील गौरवास्पद व्यक्तींपैकी एक आहेत. त्यांचे विज्ञान व सैद्धान्तिक भौतिकशास्त्र यामधील योगदान हे केवळ अद्वितीय आहे. प्रत्येक जण त्यांना '$E=mc^2$' या समीकरणाचे जनक म्हणून ओळखतो; पण हे समीकरण इतके महत्त्वाचे का आहे? आईनस्टाईन यांनी लावलेले शोध आपल्या आयुष्याचा भाग कसे बनले? आणि माणूस म्हणून ते कसे होते?
या पुस्तकात वीरेंदर कपूर यांनी आईनस्टाईनच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक पैलूचे विश्लेषण केले आहे. आपल्या सामर्थ्याचा पुरेपूर वापर कसा करावा, ते समजून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

Year of Publication- 2016
ISBN- 978-9385665-05-9
Price- Rs. 200/-
No. of Pages- 136



## उत्तम संततीसाठी शुद्ध बीजापोटी... गर्भविज्ञान मार्गदर्शक – वैद्य सौ. वैदेही संजीवन देवधर, डॉ. संजीवन शशिकांत देवधर

**पुस्तकाविषयी :**
बाळाचे वेध लागणे, ही वैवाहिक जीवनातील सुखद अवस्था आहे. उत्तम संतती घडवण्यासाठी भावी पालकांचे आपले आचार–विचार कसे असावेत, यासाठी उत्तम मार्गदर्शन करणारे हे पुस्तक ! आयुर्वेद, योग व अधिजननशास्त्र यांविषयी असणारं विपुल ज्ञान एका पुस्तकात नेमक्या शब्दात मांडलं आहे.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-59-5
Price- Rs. 200/-
No. of Pages- 148




## शिका वक्तृत्व मोदी स्टाईलने - वीरेंदर कपूर, अनुवादक : अनघा देशपांडे

Year of Publication- 2017
ISBN- 978-93-85665-61-5
Price- Rs. 199/-
No. of Pages- 164

**पुस्तकाविषयी :**

नरेंद्र मोदींचे वाक्चातुर्य केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगभरातील सर्वांना परिचित आहे; परंतु असा चतुर वक्ता म्हणून घडायला त्यांच्यात असे कोणते गुण कारणीभूत आहेत? ते त्यांनी कसे विकसित केले आहेत? आणि सर्वांत महत्त्वाचे, असे वाक्चातुर्य तुम्हीदेखील तुमच्या आयुष्यात कसे आत्मसात कराल?

वक्तृत्वकलेच्या विश्वात त्यांनी वाऱ्याची थंडगार झुळुकच आणली आहे. निव्वळ बुद्धिमत्तेच्या आणि अस्खलित शैलीच्या जोरावर त्यांनी भाषणकौशल्य व वक्तृत्वकलेची सगळी परिमाणेच बदलून टाकली आहेत. शाळकरी मुलांपासून ते संयुक्त राष्ट्राच्या काँग्रेसपर्यंत सर्वांचीच मने त्यांनी जिंकली आहेत.



## कहाणी नमोची एका राजकीय प्रवासाची - किंग्शुक नाग

Year of Publication- 2013
ISBN- 978-81-927132-4-3
Price- Rs. 250/-
No. of Pages- 244

**पुस्तकाविषयी :**

२०१४च्या लोकसभेच्या निवडणुकांदरम्यान, नरेंद्र मोदी हा एक विलक्षण प्रभावी, पण वादग्रस्त चेहरा भाजपाने केंद्रीय राजकारणात आणला. या वादळी व्यक्तिमत्त्वाची जादू या निवडणुकीत पुढे प्रभावी झाली. नरेंद्र मोदी पंतप्रधान होण्याआधी त्यांच्या कार्याची व जडणघडणीची ही प्रभावी ओळख केलेली आहे.




## वीरभरारी - डॉ. मीना शेटे-संभू

Year of Publication- 2016
ISBN- 978-9385665-17-2
Price- Rs. 375/-
No. of Pages- 296

**पुस्तकाविषयी :**

१९७१ चे भारत – पाक युद्ध अनेक कारणांनी ऐतिहासिक ठरले. या युद्धात हवाई दलाचे काही अधिकारी युद्धकैदी म्हणून पाकच्या तावडीत सापडले. त्यांच्यापैकी ग्रुप कॅप्टन (निवृत्त) दिलीप परुळकर यांनी पाकिस्तानच्या हातावर तुरी देऊन मोठ्या शिताफीने त्यांच्या तुरुंगातून आपल्या इतर दोन सहकाऱ्यांसह सुटका करून घेतली आणि भारतात परतण्याच्या मार्गावर आगेकूच सुरू केली. आपल्या दोन सहकाऱ्यांच्या साहाय्याने शत्रूच्या तुरुंगातून निसटणारे ते आजतागायतचे हवाई दलातील एकमेव अधिकारी आहेत. त्यांनी सुटकेची महत्त्वाकांक्षी योजना कशी आखली? तिला कसा आकार दिला? शत्रूच्या हाती पुन्हा सापडल्यावर काय झाले? धैर्य, धाडस, प्रसंगावधान आणि थरार असलेल्या अनेक प्रसंगांनी भरलेली दिलीप यांच्या शौर्याची रोमहर्षक कथा.




## या कातरवेळी... डॉ. अनिल गांधी

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-23-3
Price- 300/-
No. of Pages- 240

**पुस्तकाविषयी :**

डॉ. अनिल गांधी यांनी वृद्धापकाळावर हे पुस्तक लिहिले आहे; मात्र ते फक्त वृद्धांसाठी नाही. सर्वांनी वाचावे असे आहे; कारण सगळे जण कधी ना कधी वृद्ध होणारच असतात. शिवाय घरातल्या वृद्ध मातापित्यांची सुखदु:खे त्यांना कळतील आणि घर अधिक चांगुलपणाने भरून जाईल. या पुस्तकात वृद्धांसाठी उपलब्ध असलेल्या सरकारी योजना आहेत. वृद्धांचे हक्क दिलेले आहेत. वृद्धांना होणाऱ्या आजारांची, रोगांची सोप्या भाषेत ओळख करून दिली आहे.




## मुलांच्या आरोग्याच्या १०१ समस्या पालकांसाठी एक व्यावहार्य मार्गदर्शक – डॉ. प्रदीप कपूर, अनुवाद : डॉ. मीना शेटे – संभू

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-42-7
Price- Rs. 320/-
No. of Pages- 352

**पुस्तकाविषयी :**

मुलाला चांगले उपचार देण्यासाठी चांगली माहिती असलेले आणि आपल्या मुलाच्या आरोग्याची काळजी घेण्यात सक्रिय सहभाग घेणारे पालक डॉक्टरांना मदत करू शकतात. आपल्या मुलाच्या वैद्यकीय समस्येविषयी आणि तिच्या गुंतागुंतीविषयी तुम्हाला जेवढी अधिक माहिती असेल, तेवढे तुम्ही मुलासाठी अधिक चांगले उपचार मिळवू शकाल. पालकांना शिक्षित करणे आणि आपल्या मुलाच्या वैद्यकीय काळजीच्या प्रक्रियेत त्यांना समाविष्ट करून घेणे, तसेच आजाराविषयीची कोणतीही गोष्ट तशीच सोडून दिली जात नाही, याविषयी त्यांची खात्री पटवून देणे या हेतूनी हे पुस्तक लिहिले आहे.



## अबोल प्रवासी डॉ. सुनिलदत्त चौधरी यांची चरित्रगाथा - डॉ. चित्रलेखा पुरंदरे

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-31-8
Price- Rs. 300/-
No. of Pages- 264

**पुस्तकाविषयी :**
डॉ. सुनिलदत्त चौधरी यांचे विलक्षण वैशिष्ट्य त्यांच्या अंत:प्रेरणेला आहे. अशी शक्ती आत्मबोध झालेल्या महंताचीच जागृत होते, असे मानले जाते. डॉ. चौधरींना असा आत्मबोध झालेला आहे. भारतीय परंपरेत त्याग या संकल्पनेचे महत्त्वाचे स्थान आहेच. आपण सुखापेक्षा समाधानाला अधिक महत्त्व देतो. मिळवण्यापेक्षा दानाने अधिक समाधानी होतो. भौतिक मालमत्तेपेक्षा ज्ञानाला जास्त किंमत देतो. अशा ज्ञानसंपन्नतेतून, दानातून, त्यागातून परिपूर्णतेकडे जाणाऱ्या डॉ. सुनिलदत्त चौधरी यांची अद्‌भुत, विलक्षण कहाणी लेखिकेने अत्यंत ओघवत्या भाषाशैलीत चित्रित केली आहे.




## जगावेगळी माणसं - निकिता सिंह मिश्कीन इंगवले, अनुवाद : पराग पोतदार

Year of Publication- 2016
ISBN- 978-89383572-44-1
Price- Rs. 270/-
No. of Pages- 208

**पुस्तकाविषयी :**
अनरिझनेबल फेलोज अर्थात जगावेगळी माणसं यांच्या विषयीच्या या पुस्तकामध्ये जगभरातील १० निवडक सामाजिक व पर्यावरण क्षेत्रासाठी काम करणाऱ्या उद्योजकांचा समावेश केलेला आहे. हे जग अधिक सुंदर बनावे यासाठी धडपडणारे आणि त्यासाठी प्रत्यक्ष कृतिशीलतेतून आदर्श उभा करणारे असे हे सारे लोक आहेत.
त्यांनी नेहमीच्या रुळलेल्या वाटेवरून जाणे नाकारले आणि स्वत:ची पायवाट निर्माण केली. त्यांच्या या वेगळ्या साहसी वृत्तीची आणि त्यांनी उभ्या केलेल्या कामाची ओळख या पुस्तकातून नक्की होईल.



## अधुऱ्या स्वप्नांसह घराबाहेर - आरती मेनन, अनुवाद : डॉ. मीना शेटे-संभू

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-83572-77-9
Price- Rs. 350/-
No. of Pages- 288

**पुस्तकाविषयी :**
'अधुऱ्या स्वप्नांसह घराबाहेर' ही एका स्त्रीची गोष्ट आहे. ही गोष्ट वाचताना त्या स्त्रीच्या संपुष्टात आलेल्या वैवाहिक नात्याच्या आणि त्यानंतर स्वतंत्रपणे एकटीने आयुष्य जगण्याच्या प्रवासातील अनेक टप्पे वाचकांसमोर येतात. तिचा संसार मोडणं, तिने अखेर घेतलेला घटस्फोटाचा निर्णय, त्यातून तिला बसलेला नैराश्याचा धक्का आणि सर्वांत शेवटी या साऱ्यावर मात करून एक आनंदी आणि खंबीर व्यक्ती म्हणून तिचं जगणं हे सारं या पुस्तकात उलगडत जातं. जे प्रेमात पडले आणि अपयशाला सामोरे गेले, त्या सगळ्यांनाच ही तिरकस, शहाणपणाची, पण नर्मविनोदी शैलीतील गोष्ट स्पर्शून जाईल.




## द वेव्ह रायडर माहितीयुगाचा इतिवृत्तांत - अजित बालकृष्णन, अनुवाद : मानसी दांडेकर

Year of Publication- 2015
ISBN- 978-9383572-87-8
Price- Rs. 250/-
No. of Pages- 240

**पुस्तकाविषयी :**
त्यांनी २००० आणि २००८च्या मंदीतून आपल्या कंपनीला अक्षरशः खेचून बाहेर काढले. अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरच्या अतिरेकी हल्ल्यात इमारती जमीनदोस्त होताना त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्या. एकीकडे AOL आणि Netscape या एके काळच्या बलाढ्य कंपन्या धुळीला मिळताना बघून बालकृष्णन अचंबित झाले; तर दुसरीकडे फेसबुक आणि गुगलच्या गरुडभरारीचेही ते साक्षीदार झाले. भारताच्या न्यायव्यवस्थेशीसुद्धा त्यांना लढा द्यावा लागला आणि 'rediff ' या त्यांच्या कंपनीचे नाव त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावले.



## प्रेरणादायी प्रवास एका 'हिरो'चा - प्रिया कुमार, अनुवाद : पराग पोतदार

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-37-3
Price- Rs. 220/-
No. of Pages- 188

**पुस्तकाविषयी :**
अपूर्व महत्त्वाकांक्षा आणि मर्यादित साधनांच्या बळावर ओ. पी. मुंजाल यांनी १९५६ मध्ये हिरो सायकल्सची मुहूर्तमेढ रोवली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाला गती देण्यासाठी वाहतुकीचे सहज परवडणारे आणि तितकेच परिणामकारक असे साधन उपलब्ध करून द्यावे, अशी त्यांची दूरदृष्टी होती. ते म्हणतात, त्या पलीकडे जो काही आहे, तो फक्त इतिहास. हिरो सायकल्स ही जगातील सर्वाधिक सायकल उत्पादन करणारी म्हणून जागतिक विक्रम करणारी एक कंपनी.




## तर असं झालं... प्रमोद चौधरी

**पुस्तकाविषयी :**
हे पुस्तक म्हणजे व्यवस्थापनशास्त्र, यशाची गुरुकिल्ली अथवा भवितव्यासाठीचं गृहीतक नव्हे. हे एका कथेचं 'प्रामाणिक' कथन आहे. प्रमोद चौधरी यांच्याभोवती ही कथा फुलली. या कथेनं त्यांचं अवघं जीवन व्यापून टाकलं आणि आजही परिस्थिती काही वेगळी नाही. या पुस्तकातून कुणाला प्रोत्साहन मिळेल किंवा एखादी नवी कल्पना सुचेल. कदाचित, कुणाला हेतुतः शोध न घेताही काही सल्लाही मिळेल. हे प्रमोद चौधरी यांच्या आयुष्यातले काही ठळक प्रसंग आणि निवडक आठवणी आहेत.

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-83575-46-2
Price- 225/-
No. of Pages- 264




## काठमांडूच्या रस्त्यावरून - बासु राय, अनुवाद : डॉ. मीना शेटे - संभू

**पुस्तकाविषयी :**
एक छोटा मुलगा आपल्या घराच्या पायऱ्यांवरून खाली उतरला आणि घराबाहेर पळून गेला. बहुतेक लहान मुले असे करतात; परंतु या लहान मुलाला रोखण्यासाठी कोणीही नव्हते. त्याला नाव नव्हते. त्या लहान मुलाचे वडील त्या मुलाला आपल्या मृत्यूपर्यंत एक कहाणी सांगत राहिले होते. हा मुलगा सहा महिन्यांचा असल्यापासूनच ते ती कहाणी त्याला सतत सांगत राहिले होते. त्याच्या मनात तेवढ्या एकाच गोष्टीची स्मृती होती. वडील मरण पावले, त्या वेळी हा मुलगा फक्त चार वर्षांचा होता. या मुलाच्या वडलांच्या प्रेमाची आणि त्यांच्या झालेल्या विश्वासघाताची ही कथा आहे.

Year of Publication- 2016
ISBN- 978-9383572-85-4
Price- Rs. 340/-
No. of Pages- 288




## अनंत माझी ध्येयासक्ती - सुमेधा महाजन, अनुवाद : आश्लेषा गोरे

**पुस्तकाविषयी :**
'अनंत माझी ध्येयासक्ती' ही सुमेधा महाजन नावाच्या एका विवाहित, कमावत्या स्त्रीची वास्तवातील गोष्ट आहे. सुमेधाला जन्मतःच दमा होता आणि लहानपणी हॉस्पिटल हे जणू काही तिचे दुसरे घरच होते. तंदुरुस्त राहता यावे आणि दम्याचे उसळी मारून वर येणे कमी व्हावे म्हणून तिने पळायला सुरुवात केली; पण नंतर पळणे हीच तिची जीवनशैली बनून गेली. त्यानंतर २०१२च्या एप्रिल महिन्यात तिने दिल्ली ते मुंबई असा १५०० किलोमीटरचा टप्पा तीस दिवसांत पूर्ण करण्याचा संकल्प सोडला. त्याने तिच्या स्वतःच्या मर्यादांवर मात करण्यास भाग पाडले. जेव्हा तिने अंतिम रेषा यशस्वीरीत्या पार केली, तेव्हा तिने स्वतःच्या शारीरिक मर्यादांवर मात केलीच; पण तिला जबरदस्त अपयश येणार, अशी खात्री असलेल्या बघ्यांच्या पूर्वग्रहावरदेखील मात केली.

Year of Publication- 2016
ISBN- 978-9383572-09-0
Price- Rs. 250/-
No. of Pages- 218



## ना वळणे माघारी - शिवानी गुप्ता, अनुवाद : मानसी दांडेकर

**पुस्तकाविषयी :**
अपंगत्वाने केलेल्या आघातामुळे खचून न होता, जीवनातल्या आव्हानांना तोंड कसे दिले पाहिजे यावर एक प्रेरणादायक अद्भुत, सत्य कथानक. धैर्याची, निर्धाराची आणि मानवी धाडसाचा परिचय देणारी एक हृदयद्रावक व सत्यकहाणी.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-36-6
Price- Rs. 195/-
No. of Pages-192




## विजय मल्ल्या एक कहाणी - के. गीरीप्रकाश, अनुवाद : सायली गोडसे (चरित्र)

**पुस्तकाविषयी :**
'द किंग ऑफ गुड टाईम्स' हे बिरूद यथार्थ मिरवणाऱ्या व्यक्तीचे संयत आणि मर्मभेदी चित्रण.
विजय मल्ल्या हे भारतातील अत्यंत प्रसिद्ध व्यावसायिकांपैकी एक. या व्यक्तीचे तपशीलवार आणि जिवंत असे हे इतिवृत्त आहे.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-51-9
Price- Rs. 230/-
No. of Pages- 208




## क्रॅकिंग द कोड-माझा बॉलिवूडचा प्रवास, आयुष्मान खुराना । ताहिरा कश्यप, अनुवाद: अरुंधती कुलकर्णी-जोशी

**पुस्तकाविषयी :**
बॉलिवूडची चमचमती दुनिया, त्यातील नाट्य तुम्हाला भावत असेल, ही दुनिया आपली व्हावी अशी ऊर्मी तुमच्या मनात असेल, तर इथे व्यावसायिक नट म्हणून पदार्पण करण्याची योग्य वेळ कशी ओळखावी? चित्रपट व टीव्हीच्या कलाक्षेत्रात प्रवास करताना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो? ही वाट तुम्हाला कुठपर्यंत घेऊन जाऊ शकेल? आणि सर्वांत कळीचा मुद्दा म्हणजे, हे सर्व तुम्ही कसे घडवून आणाल? 'Cracking the Code'मध्ये प्रसिद्ध अभिनेता, गायक, टीव्ही कलाकार आयुष्मान खुराना या मायानगरीतील यशाचे गमक क्रमाक्रमाने सांगत आहेत.

Year of Publication- 2017
ISBN- 978-93-85665-72-1
Price- Rs. 150/-
No. of Pages- 106

# माहितीपर




## अंतर्गत सुरक्षेचा यक्ष प्रश्न - विद्याधर वैद्य

**पुस्तकाविषयी :**
देशाचे अंतर्गत स्वास्थ्य हेदेखील तितकेच महत्त्वाचे आणि गंभीर स्वरूपाचे आव्हान आहे. या आव्हानाच्या विविध पैलूंचा आढावा घेण्याचा हा प्रयास आहे. देशापुढे ठाकलेली आंतरिक आव्हाने एक नव्हे, तर अनेक आहेत. धार्मिक तेढ, अनेक प्रकारचे अंतर्गत कलह, दहशतवादाचा कर्करोग, आटोक्याबाहेर जाणारी लोकसंख्या, बांगलादेशी घुसखोरांची समस्या, पोलीस यंत्रणेची दुरवस्था, राजकारणातील वाढती गुन्हेगारी, प्रशासकीय संस्थांचे खच्चीकरण ही त्यांपैकी काही प्रमुख उदाहरणे आहेत. या सर्वांवर गांभीर्याने विचार करणे हीच आजच्या काळाची गरज आहे.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-90-8
Price- Rs. 300/-
No. of Pages- 276




## हरवलेले सुशासन – माधव गोडबोले, अनुवाद : सुजाता गोडबोले

**पुस्तकाविषयी :**
या पुस्तकात भ्रष्टाचारात बुडलेले सरकार, काही थोड्या भांडवलशहांचे हितसंबंध, कायद्याचे राज्य, धर्मनिरपेक्षता, संस्थांची सचोटी, अभिव्यक्तीस्वातंत्र्य यांसारख्या सार्वजनिक जीवनातील अनेक क्षेत्रांचा साकल्याने आढावा घेण्यात आला आहे. काही धोरणात्मक बदल घडवून आणण्याने देशाच्या प्रशासनात कसा बदल घडवून आणता येईल, याबाबतचे परखड भाष्य ह्यामध्ये करण्यात आले आहे. ओघवत्या शैलीतील 'हरवलेले प्रशासन' या विचारप्रवर्तक पुस्तकात देशाच्या राजकारणातील समस्यांवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकण्यात आला आहे. भविष्यातील भारत कसा असावा, हे ठरवण्यासाठी जनतेने माहितीपूर्ण पद्धतीने व जाणीवपूर्वक लोकशाहीत सहभागी होण्याचे हे पुस्तक आवाहन करते.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-41-0
Price- Rs. 450/-
No. of Pages- 484




## सायबर युद्ध नीती- डॉ. दीपक शिकारपूर

**पुस्तकाविषयी :**
गेल्या पाचपंचवीस वर्षांत विज्ञान–तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातील सर्व आर्थिक–सामाजिक–राजकीय चित्रं, धोरणं आणि समीकरणं आरपार बदलली! ह्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स व उपग्रहीय संवादमाध्यमांचा फार मोठा वाटा आहे आणि त्यांमध्येही सूक्ष्म तंत्रज्ञान (नॅनो टेक्नॉलॉजी), सर्व संगणकीय वैशिष्ट्ये समाविष्ट असलेला सेलफोन आणि इंटरनेट यांमुळे जगाच्या कानाकोपऱ्यांतल्या माणसांचेही जीवनचित्र पूर्णतः वेगळं झालं. (झालं नसलं तर लवकरच होईल!) या प्रकारे आणखी एका क्षेत्रातील धोरणांचा आणि साधनांचा मोठ्या प्रमाणात कायापालट झाला आहे – युद्ध, युद्धनीती आणि युद्धसाहित्य. बदलत्या तंत्रज्ञानानुसार आजच्या सैनिकाचे आणि युद्धतंत्राचे स्वरूपही खूपच बदललं आहे.

Year of Publication- 2015
ISBN- 978-81-927132-6-7
Price- Rs. 150/-
No. of Pages- 144



## सायबर गुन्हे - डॉ. दीपक शिकारपूर व ॲड. वैशाली भागवत

**पुस्तकाविषयी :**
इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे २१व्या शतकात उद्भवलेली मोठी समस्या म्हणजे सायबर गुन्हे! डॉ. दीपक शिकारपूर आणि ॲड. वैशाली भागवत यांनी याविषयीच्या केसेसचा अनुभव यामध्ये विशद केला आहे. सायबर स्टॉकिंग, फिशिंग, आयडेंटीटी थेफ्ट आणि इतर ऑनलाइन घोटाळ्यांपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे, याचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन या पुस्तकात आहे.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-58-8
Price - Rs. 125/-
No. of Pages- 112




## अ मिलियन ब्रोकन विंडोज - डॉ. मकरंद वायंगणकर, अनुवाद : निमिश पडगांवकर

**पुस्तकाविषयी :**
क्रिकेट या खेळाचे एका अर्थाने भारतातील जन्मस्थान असणाऱ्या मुंबईने, संपूर्ण देशाच्या असलेल्या आणि देशभरात खेळल्या जाणाऱ्या या खेळावर सततच कसे अधिराज्य गाजवले आहे, याचीच 'अ मिलियन ब्रोकन विंडोज' ही चित्तवेधक कहाणी.

Year of Publication- 2016
ISBN- 978-9383572-95-3
Price- Rs. 250/-
No. of Pages-288

# व्यवस्थापन शास्त्र




## देवकृपा आणि जाहिराती - ॲम्बी परमेश्वरन, अनुवाद : डॉ. मीना शेटे - संभू

**पुस्तकाविषयी :**
ॲम्बींनी या पुस्तकात सर्वत्र वैयक्तिक कथा, रंजक प्रसंग, विविध प्रकारे मिळालेले धडे आणि संशोधन व इतर प्रकाशित साहित्यातील उतारे दिले आहेत. धर्म कसा उत्क्रांत झाला आणि हुशार विपणनतज्ज्ञांनी या लाटांवर स्वार होत त्यानुरूप आपली उत्पादने आणि सेवा कशा प्रकारे तयार केल्या, यात स्वारस्य असणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक म्हणजे एक मेजवानीच आहे.

Year of Publication- 2017
ISBN- 978-93-85665-52-3
Price- 350/-
No. of Pages- 278



## जाहिरातींत तडजोड नाहीच! - प्रा. डॉ. सुभाष य. पवार

**पुस्तकाविषयी :**
बाजारपेठ वाढल्यामुळे त्यांना सेवा देणाऱ्या जाहिरातक्षेत्राचीही मोठी वृद्धी झालेली आहे. तेथे प्रशिक्षित व उच्चशिक्षित कलाकारांची, तसेच कर्मचाऱ्यांना आवश्यकता असल्याने हे शास्त्र शिकविणाऱ्या कलासंस्थां (डिझाइन स्कूल्स)ची संख्यादेखील वाढत चाललेली आहे. तेथे शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना संदर्भासाठी त्यांच्या विषयांवर मराठीतून प्रसिद्ध होणारी पुस्तके नगण्य आहेत आणि म्हणूनच याच क्षेत्रात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या सिद्धहस्त लेखकाकडून लिहिले गेलेला हा ग्रंथ जाहिरातकला क्षेत्रात भवितव्य घडवू इच्छिणाऱ्या प्रत्येकास गरजेचा व उपयुक्त ठरणार आहे.

Year of Publication- 2016
ISBN- 978-9383572-68-7
Price- Rs. 575/-
No. of Pages- 384




## कथा गोष्ट सांगा, स्वप्न विका - शोभा नारायण, अनुवाद : अमोल अशोक आगवेकर

**पुस्तकाविषयी :**
'गोष्ट सांगा, स्वप्न विका' हे बिझनेसमधील कथाकथनाबाबत सांगणारे पुस्तक आहे. कथांचं महत्त्व काय, कथा सांगणंच कधी गरजेचं असतं, सर्वांत प्रभावशाली कथा कशा शोधाव्यात आणि त्या कशा सांगाव्यात, हे तुम्हाला या पुस्तकातून कळेल; मग तुम्ही बिझनेस असोसिएट्स, भागधारक, कर्मचारी किंवा सहकाऱ्यांशी का बोलत असेना.
कथाकथनाचं कौशल्य कदाचित क्रमांक एकचं कौशल्य का आहे, बिझनेस आणि व्यवस्थापनामध्ये कथाकथनाची शक्ती आपली उद्दिष्टं साध्य करण्यासाठी गुरूकिल्ली कशी ठरते, हे कथांमध्ये सप्रमाण आणि साध्या-सरळ भाषेत मांडलं आहे.

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-07-3
Price- Rs. 280/-
No. of Pages- 232




## आनंदाची दैनंदिनी वाट सुखा - समाधानाची - डॉ. रेखा शेट्टी, अनुवाद : डॉ. श्रुती पानसे

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-08-0
Price- Rs. 320/-
No. of Pages- 264

**पुस्तकाविषयी :**
खरंखुरं आनंदात जगणं सोपं असतं, हे तुम्हाला पुस्तक वाचून नक्कीच पटेल. हे पुस्तक म्हणजे एक वर्षाची मार्गदर्शिका आहे. डायरीच म्हणा ना! हे पुस्तक जेव्हा विकत घ्याल, त्या महिन्याचं पान उघडा. त्याच आठवड्यापासून पुस्तक वापरायला सुरुवात करा. मनापासून समाधान मिळवायचं असेल, तर काही एक योजना आखण्याची निश्चितच गरज असते. हे लक्षात घेऊन वर्षातल्या ५२ आठवड्यांसाठीची योजना पुस्तकात दिली आहे.




## वडेवाला कर्मयोगी - सतीश मंडोरा, अनुवाद : मुक्ती काणे

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-06-6
Price- Rs. 200/-
No. of Pages- 152

**पुस्तकाविषयी :**
आयुष्यातील सर्वांत मोठ्या आंतरिक ज्ञानाच्या जाणिवा साध्या–सोप्या गोष्टींतून का व कशा येतात, याबद्दलची चर्चा सतीश मंडोरा ह्यांनी 'वडेवाला कर्मयोगी' या पुस्तकात केली आहे. हे पुस्तक दैनंदिन कृतींमध्ये स्वतःचे साक्षात्कार शोधण्याबद्दल आहे.
हे पुस्तक आयुष्यातील बहुतांश सामान्य घटनांकडे बघण्याचा तुमचा दृष्टिकोनच बदलून टाकेल. ज्या छोट्या बदलांनी मोठे परिणाम घडू शकतात, त्या बदलांविषयीचे 'वडेवाला कर्मयोगी' हे पुस्तक आहे.




## हेअर योगा - जावेद हबीब, अनुवाद : सायली गोडसे

Year of Publication- 2016
ISBN- 978-9385665-01-1
Price- Rs. 200/-
No. of Pages- 136

**पुस्तकाविषयी :**
'हेअर योगा' या पुस्तकाद्वारे जावेद हबीब यांनी केसांची अगदी प्राथमिक काळजी घेण्यापासून ते केसांच्या कुठल्याही प्रकारच्या जटिल समस्येशी मुकाबला करण्यापर्यंतच्या सर्व बाबींचे मार्गदर्शन केले आहे. छोट्या–छोट्या उपयुक्त टिप्स आणि उपाययोजनांनी परिपूर्ण असलेले हे एक आगळे आणि सुरेख पुस्तक आहे, की जे तुमच्या केसांच्या आरोग्याची काळजी पूर्णतः तुमच्या स्वाधीन करते ; ज्यामुळे तुम्ही मिळवू शकता आणि मिरवूही शकता – सुंदर, आरोग्यदायी केस, अगदी दररोज.



## म्हणून आज ते सुपरस्टार्स आहेत - प्रियांका सिन्हा-झा, अनुवाद : मानसी दांडेकर

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-35-9
Price- Rs. 200/-
No. of Pages- 190

**पुस्तकाविषयी :**
चित्रपटसृष्टीतल्या अभिनेत्यांना लोकं खूप प्रेम आणि सम्मान देतात. बरेच जण त्यांना आपला आदर्शदेखील मानतात. त्यांच्यात असं काय असतं जे सामान्य माणसात दिसत नाही, हे शोधण्याचा प्रयत्न करतात. या पुस्तकात प्रियांका झा यांनी बॉलीवुडमधल्या ११ प्रसिद्ध व्यक्तींच्या गुणधर्मांचे वर्णन करून ह्याच प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे.



## बाई ग, तू पुरुष नाहीएस - अपूर्वा पुरोहित, अनुवाद : शर्मिला रानडे

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-34-2
Price- Rs. 175/-
No. of Pages- 160

**पुस्तकाविषयी :**
आजची स्त्री ही पुरुषांबरोबर समाजात खांद्याला खांदा लावून उभी आहे. काम व घर ह्या दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडूनदेखील ती आपल्या व्यावसायिक आयुष्यात कशा प्रकारे यश गाठू शकते, याबद्दल मार्गदर्शन करणारे उद्बोधक पुस्तक. स्वतःचं व्यक्तिमत्त्व शोधणे आणि आपली प्रतिष्ठा सांभाळणे अशा अनेक विषयांवर संक्षिप्त मार्गदर्शन केले आहे. बाई गं तू पुरुष नाहीएस' हे एक संवेदनशील, उत्साहपूर्ण व विनोदी कथानक आहे. काम व घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये समतोल साधून यशस्वी, समाधानी व सुखी आयुष्य जगू इच्छिणाऱ्या प्रत्येक स्त्रीने हे पुस्तक आवर्जून वाचावे!

# व्यक्तिमत्त्व विकास




## रिफ्लेक्सोलॉजी - प्रा. डॉ. सुभाष य. पवार

**पुस्तकाविषयी :**
संवेदनाशील लहान–थोरांनादेखील कोणी पाय हळुवारपणे चेपले असता किंवा त्याला मर्दन केले असता छान वाटू लागते. अशी ही नैसर्गिक उपचारपध्दती मानवासाठी कित्येक शतकांपासून कार्यरत राहिलेली आहे. त्याच्यावर शास्त्रशुद्ध संशोधन होऊन त्याला नाव दिलेले आहे रिफ्लेक्सोलॉजी.

Year of Publication- 2015
ISBN- 978-9383572-94-6
Price- Rs. 50/-
No. of Pages- 50




## योग्य नोकरी मिळवताना हमखास यशस्वी मुलाखतीचे तंत्र - प्रतिभा मेस्सनर, वोल्फगांग मेस्सनर, अनुवाद : मानसी दांडेकर

**पुस्तकाविषयी :**
प्रथमच नोकरी मिळवणे किंवा नोकरीत बदल करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक वरदान आहे. मुलाखतीचा योग्य उमेदवार बनण्यासाठी, दृष्टिकोन, कौशल्य, महत्त्वाकांक्षा आणि अपेक्षा यांना विषयवार प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, हमखास यशस्वी होणारी मुलाखत देण्यासाठी, तुम्हाला मिळालेले काम तुमच्यासाठी योग्य आहे का, या प्रश्नाच्या उत्तरासाठी. आणि आत्ताचं तमचं काम दिमाखदारपणे सोडून जाताना तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविण्यासाठी, नोकरीत दमदार प्रवेश करण्यासाठी हे पुस्तक हमखास यशाचा रस्ता दाखवेल.

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-82-3
Price- Rs. 240/-
No. of Pages- 240

# कथासंग्रह




## तनहाई - माधुरी तळवलकर

**पुस्तकाविषयी :**
’तनहाई’ या कथासंग्रहातील ’कैद’ या कथेला गंगाधर गाडगीळ कथापुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य पुरस्कार, मृत्युंजय पुरस्कार, साने गुरुजी बालवाङ्मय राज्यस्तरीय पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळवणाऱ्या माधुरी तळवलकर यांच्या ’तनहाई’ या कथासंग्रहातील कथा वाचकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवतील, यात शंका नाही.

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-28-8
Price- Rs. 260/-
No. of Pages- 216




## दान - अनघा केसकर

**पुस्तकाविषयी :**
अनघा केसकर यांची कथा काळाच्या प्रवाहाबरोबर बदलत जाणाऱ्या जीवनशैलीचे, नातेसंबंधांचे आणि मानवी व्यवहारांचे दर्शन घडवते. सर्वसाधारण मध्यमवर्गी माणसाच्या आयुष्यात अगदी साध्या (किंवा कधी कधी विशेषही) घटनेने उठणारे तरंग हा त्यांच्या कथेचा मुख्य गाभा आहे. म्हणूनच त्यांच्या बहुतांशी कथेतील वातावरण उच्च मध्यमवर्गी आणि शहरी असले, तरी त्यातल्या समस्या आणि परिस्थिती मात्र कुठल्याही सर्वसामान्य वाचकाला जवळची वाटते.

Year of Publication- 2017
ISBN- 978-93-85665-26-4
Price- 225/-
No. of Pages- 170




## गुंता - अनघा केसकर

**पुस्तकाविषयी :**
झपाट्याने बदलत चाललेल्या आणि अधिक गुंतागुंतीच्या होत चाललेल्या सामाजिक, कौटुंबिक वास्तवाचा आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या मानवी समस्यांचा धांडोळा घेणाऱ्या कथा हे अनघा केसकर यांच्या कथांचे वैशिष्ट्य आहे. आर्थिक समृध्दीच्या लालसेने अमेरिकेत स्थलांतर केलेल्या आणि म्हणूनच आपली जिव्हाळ्याची माणसे मागे सोडून गेलेल्या तरूण पिढीपुढचे व्यावहारिक आणि भावनिक प्रश्न त्यात आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे पदोपदी येणारे निराशाजनक वातावरण, दत्तक मुलाच्या पालकांना भेडसावणाऱ्या चिंता, सेवाभावी संस्थातल्या प्रशासनाच्या पद्धती, यशस्वी माणसांची उदार, तरीही कोती मानसिकता अशा विविध विषयांभोवती त्यांची कथा फिरते.

Year of Publication- 2017
ISBN- 978-93-85665-27-1
Price- 225/-
No. of Pages- 172




## जाणता अजाणता - योगिनी वेंगुर्लेकर

**पुस्तकाविषयी :**
जागतिकीकरणानंतर एकूणच जगण्याला जो वेग आला, त्यात माणसं चाचपडायला लागली. जुनं सगळंच हरवत चाललंय नि नवं काहीच हाती येत नाहीसं झालेलं. हा काळच संक्रमणाचा. संस्कृती, राजकारण, समाजकारण सगळंच पार ढवळून निघालेलं. या अवकाशात 'स्वत:'चीच ओळख चाचपडायची वेळ आलेला माणूस वेंगुर्लेकरांच्या कथेचा विषय बनून वाचकांसमोर येतो, तेव्हा वाचकांना जगण्याचा एक वेगळाच पैलू खुणावत राहतो.

Year of Publication- 2017
ISBN- 978-93-85665-25-7
Price- 225/-
No. of Pages- 178



## स्वान्तसुखाय - ज्योती कानेटकर

**पुस्तकाविषयी** : स्त्रीच्या अंतरंगाचा वेध घेताना स्त्री–पुरुष संबंधांमधले अनेक पैलू 'स्वान्तसुखाय' या पुस्तकातील कथांमध्ये चित्रित झाले आहे. ज्योती कानेटकरांचे वैशिष्ट्य हे की, त्या जगातल्या व्यवहारांमागे दडलेले सत्य अत्यंत मनस्वीपणे अनुभवतात आणि तितक्याच उत्कटतेने त्यात रंग भरून लयदार शैलीत आपल्यासमोर चितारतात.

Year of Publication- 2017
ISBN- 978-93-85665-24-0
Price- 225/-
No. of Pages- 176



## अल्याड पल्याड सुषमा पेण्ढरकर

**पुस्तकाविषयी :**
यातील बहुतेक कथा अमेरिकेत स्थायिक झालेल्या कुटुंबांत घडणाऱ्या घटनांवर आधारित आहेत. अनेक कौटुंबिक समस्या, घटस्फोट, दुसऱ्या पार्टनरचा शोध, एकटेपण, मुलांची बिथरलेली वागणूक अशा समस्यांवर या कथा बेतलेल्या आहेत. कथांचे मुख्य आशयसूत्र 'स्त्री–पुरुष नात्यांचा शोध' घेण्याचाच असल्याचे जाणवते. सुषमाताईंच्या कथांतून केवळ सामाजिक प्रश्नांच्या उहापोहात न अडकता मानवी जीवनाचे दर्शन घडते.

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-39-4
Price- 280/-
No. of Pages- 224



## पूर्वसंचित गोफ नात्यांचा

**पुस्तकाविषयी :**
आजी, आजोबा आणि नातवंडं... एक विलोभनीय नातं.. नात्याचे पदर तरी किती! हळुवार मर्मबंधात जपून ठेवण्यासारखे! आजच्या विज्ञानयुगात मात्र नात्यांचे संदर्भ बदलताना दिसत आहेत. विज्ञानामुळे सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या बदलत असलेल्या वास्तवात आजी–आजोबा आणि नातवंडं या नात्याचे काय होणार? स्काय–फाय कट्ट्यावरील विज्ञानकथा लेखकांनी या बदलत्या नातेसंबंधांचा घेतलेला हा शोध – कधी भविष्यात नेऊन, तर कधी अगदी आजच डोळे उघडायला लावतो.

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-13-4
Price- Rs. 260/-
No. of Pages- 276




## निर्भया - कुसुम चोप्रा, अनुवाद : डॉ. मीना शेटे-संभू

**पुस्तकाविषयी :**
'प्रश्नचिन्हांनी दुरुस्ती केलेली' असे वर्णन केल्या जाणाऱ्या संस्कृतीमध्ये स्त्रियांची नेमकी भूमिका काय असते? ती एक 'जेवणाचा पास' असते का? की पंचिंग बॅग असते? वृद्ध पालक, मुले वगैरेंची काळजीवाहक असते? की तिसरे चाक असते? की धमक्यांवर, दहशतीवर मात करत स्वतःचे अवकाश, स्वतःची ओळख निश्चित करणारी, स्वतःचे हक्क असलेली स्वतंत्र व्यक्ती असते? कुसुम चोप्रा यांच्या आतापर्यंत ऐकिवात नसलेल्या प्रकारातील कथा चकित करतात किंवा गंभीरपणे विचार करायला भाग पाडतात. स्त्रियांची मानसिकता कशी कार्य करते, याची उकल करतात. स्त्रीविषयक कथांचे अनेक पैलू आपल्याला पाहायला मिळतात.

Year of Publication- 2015
ISBN- 978-9383572-76-2
Price- Rs. 300/-
No. of Pages- 278



## खंडाळ्याच्या घाटासाठी – शुभदा गोगटे

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-75-5
Price- Rs. 320/-
No. of Pages- 402

**पुस्तकाविषयी :**
सह्याद्रीच्या डोंगररांगांना परत एकदा जाग आली होती !
हिंदवी स्वराज्यासाठी झालेल्या अनेक लढाया सह्याद्रीनं पाहिल्या होत्या. त्याचे अभेद्य तट भेदू लागली तेव्हा तो खडबडून जागा झाला आणि त्याच्या लक्षात आलं की ही एक नवीन लढाई सुरू झाली आहे आणि ही लढाई दुसऱ्या–तिसऱ्या कोणाशी नसून, खुद्द आपल्याशी आहे! निर्बल माणसाच्या प्रबल इच्छाशक्तीच्या दर्शनानं तो अचंबित झाला, प्रभावित झाला आणि मग हळूहळू सह्याद्री माणसाला वाट करून देऊ लागला. माणसाच्या प्रयत्नांपुढे त्यानं मान तुकवली. आपल्या राज्यातून वहिवाट करण्याचा माणसाचा अधिकार त्यानं मान्य केला.
या लढाईची रसभरीत वर्णनं कुठल्याही इतिहासाच्या पुस्तकात लिहिली जाणार नव्हती, की शाहीर पोवाडे गाणार नव्हते; पण सामान्य माणसाचं आयुष्यच तिच्यामुळे बदलून जाणार होतं आणि ही वाट सह्याद्री एखाद्या दागिन्यासारखी स्वत:च्या अंगावर मिरवणार होता!



## मुंबईस्तान – पियुष झा, अनुवाद : डॉ. मीना शेटे – संभू

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-38-0
Price- Rs. 230/-
No. of Pages- 248

**पुस्तकाविषयी :**
या पुस्तकाविषयी आलेले मान्यवर संपादकांचे अभिप्राय.
१. 'मुंबईस्तान' हे एक उत्तम कथानक असून या प्रकारच्या लेखनाची आवड असलेल्यांना पूर्ण वाचून झाल्याशिवाय हे पुस्तक खाली ठेवणं शक्य होणार नाही. उत्सुकतापूर्ण थरारकतेच्या शोधात असणाऱ्या वाचकांना हे पुस्तक नक्कीच आवडेल.– डीएनए
२. पुस्तकाच्या सुरुवातीपासूनच बंदुकीच्या गोळ्यांची धग जाणवू लागते आणि तीच तीव्रता अखेरपर्यंत टिकून राहते. – टाईम आऊट, मुंबई.
३. कथेची गतिमानता किंचितशीही कमी होऊ न देता, विविध दृश्यांच्या तुकड्यांमध्ये अत्यंत अचूकपणे या कथा मांडल्या गेल्या आहेत. – द हिंदू



## ॲन्टी सोशल नेटवर्क – पियुष झा, अनुवाद : डॉ. मीना शेटे - संभू

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-40-3
Price- Rs. 220/-
No. of Pages- 200

**पुस्तकाविषयी :**
'मुंबईस्तान' आणि 'कंपास बॉक्स किलर' या उत्तम खपाच्या दोन पुस्तकांपाठोपाठ मुंबईस्तान गुन्हेगारीविषयक–थरारकथांच्या मालिकेतील हे तिसरे पुस्तक.
गडद रहस्याने भरलेली आणि अनेक धाडसी थरारांनी बनलेली 'ॲन्टी सोशल नेटवर्क' ही थरारकथा म्हणजे इन्स्पेक्टर वीरकरने हाताळलेले आतापर्यंतचे सर्वाधिक अवघड प्रकरण आहे.



## कंपास बॉक्स किलर - पियुष झा, अनुवाद : डॉ. मीना शेटे - संभू

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-39 -7
Price- Rs. 230/-
No. of Pages- 240

**पुस्तकाविषयी :**
या पुस्तकाविषयी आलेले मान्यवर संपादकांचे अभिप्राय.
● या पुस्तकात पियुष झा यांनी लिहिलेली कथा अगदी परिपूर्ण आहे. – आयबीएन लाइव्ह.कॉम
● गुन्हेगारीविषयक थरारकथा आवडणाऱ्या वाचकांसाठी मेजवानी. – टाईम आऊट मुंबई
● अगदी उत्तम बांधणीची थरारकथा.– टाइम्स ऑफ इंडिया ● एक परिपूर्ण थरारकथा. 'कंपास बॉक्स किलर'मध्ये योग्य प्रमाणात रहस्य, कलाटण्या आणि वळणे आहेत. डिटेक्टिव्ह कथा वाचणाऱ्या वाचकांना खिळवून ठेवणारी कादंबरी.– बिझनेस स्टँडर्ड

# आध्यात्मिक




## कथा पांडुरंगा – भारत भूषण

Year of Publication- 2015
ISBN- 978-93-83572-79-3
Price- Rs. 100/-
No. of Pages- 104

**पुस्तकाविषयी :**
गेल्या ४००हून अधिक वर्षांपासून खास महाराष्ट्राची, त्यातल्या त्यात दख्खनची आपली अशी एक परंपरा म्हणजे वारी! पांडुरंगाचे भक्त आणि त्यांची निस्सीम भक्ती, त्यांची आळंदी–देहू–पंढरपूर वारी यावर आधारित आध्यात्मिक अंतरंगाचा आनंद आणि अनुभूती देणारे 'कथा पांडुरंगा' हे पुस्तक सर्वांनाच आवडेल.
'कथा पांडुरंगा' हे इंग्रजी भाषेतील सन २०१३मध्ये प्रकाशित झालेले पुस्तक सर्वसामान्य भक्तांपर्यंत जाऊन पोहोचावे तसेच कथेतील आध्यात्मिक महत्त्व मातृभाषेतून अनुभवता यावे, यासाठी हे पुस्तक मराठीतून प्रकाशित करण्यात येत आहे. या पुस्तकासाठी पद्मभूषण प्रा. डॉ. शां. ब. मुजुमदार, संस्थापक व अध्यक्ष, सिंबायोसिस, पुणे यांनी मनोगत लिहिले आहे.




## जीवनसंध्या... - डॉ. अनिल गांधी, अनुवाद : श्री. चेतन कोळी

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-37-0
Price- 250/-
No. of Pages- 192

**पुस्तकाविषयी :**
डॉ अनिल गांधीजी ने यह पुस्तक ज्येष्ठ व्यक्तियों के लिए तथा उनके लिए तथा उनके लिए कार्य करनेवाली संस्थाओ के लिए समाजिक कर्तव्य भावना से लिखी है। इस पुस्तक के हर एक पन्ने में उनका वह भाव प्रतिबिंबित हुआ है। जीवन की संध्या के समय में अर्थात दो कालों के संधिकाल में अटके व्यक्ति के तन–मन में जो तूफ़ान उमड़ आते है, उनका वर्णन तो उन्होंने किया है ही। साथ उसके लिए उपायों की दिशा, ज्येष्ठ व्यक्तियों का शारीरिक, मानसिक तथा भावनिक शोषण, ज्येष्ठ नागरिकों के लिए उपलब्ध कानून, उनका अर्थकारण, ज्येष्ठ व्यक्तियों की सहायता करनेवाली संस्थाओ की जानकारी आत्यंतिक वास्तव और सरल शब्दों में प्रस्तुत की है।




## रियालीटी बाइटस - अपर्णा शर्मा, अनुवाद : डॉ. टी. वी. राव

Year of Publication- 2016
ISBN- 978-93-85665-42-4
Price- 250/-
No. of Pages- 234

**पुस्तकाविषयी :**
'रियालीटी बाइट्स' एक सरल, आसान और उपयोगी किताब उन सभी के लिए प्रबंधन का अध्ययन करने वाले छात्र हो, या करोबार जुड़े नये व्यवसायिक हो, या फिर व्यावहारिक प्रबंधन। एच. आर. के जटिल सिद्धांतो को बड़े ही सा और तरीके से और हर अध्याय के आखिर में व्याहारिक घटनाओं द्वारा समझाया गया है। यह किताब बरसों की प्रायोगिक अनुभूतियों का उल्लेखनीय सारांश तथा सारभूत ज्ञान है। बहुत ही अनुशासित है! मौजूदा मानव संसाधन के क्षेत्र में का कर रहे व्यावसायिक अपनी रोज़मर्रा की जिन्दगी में इसका इस्तेमाल कर सकेगें और इसके इस्तेमाल से मानव संसाधन के सिद्धांत तथा घटित होने वाले अपने कार्य स्थल के प्रकरण के बीच के अंतर को पाट सकेगें और अपने कार्यस्थल में क्रियान्वित कर सकेंगें।

## आगामी





















| पुस्तकाचे नाव | लेखक | साहित्य प्रकार |
|---|---|---|
| • एफ वन स्टोरी | निमिष. वा. पाटगांवकर | कादंबरी |
| • क्रॅकिंग द कोड | आयुष्मान खुराना | चरित्र |
| • मनी स्मार्ट | रीणिता मल्होत्रा–होरा, दिव्या विज | अर्थविश्व |
| • अवर किड्स इट एव्हरीथिंग | निलंजना सिंग | पालकत्व |
| • संघर्षाचे जीवनगीत बंट सिंग | निरुपमा दत्त | चरित्र |
| • मिसिंग चिल्ड्रन ऑफ इंडिया | कैलास सत्यार्थी | माहितीपर |
| • मी अंजली... स्थलांतरित वधूची रोजनिशी | निम घोलकर | कादंबरी |
| • भारतीय भूगोलाचा अतुलनीय इतिहास | संजीव सन्याल | माहितीपर–संदर्भ |
| • कर्णपत्नी | कविता काणे | कादंबरी |
| • व्हॅनिटी बाघ | अनिस सलिम | अनुवादित |
| • एखाद चागलं स्थळ आहे का हो..! | मिती श्रॉफ – शाह | अनुवादित–माहितीपर |
| • कलियुगाचा उदय (दुर्योधनाचे महाभारत) | आनंद नीलकंठन | कादंबरी(पौराणिक) |
| • कोडे आमचे डोके तुमचे | पी. प्र. आपटे | स्पर्धा परीक्षा – संदर्भ |
| • व्यावहारिक व उपयोजित मराठी | डॉ. बी. आर. रोडे | स्पर्धा परीक्षा – संदर्भ |
| • भाव फुगवटा | बी. व्ही. कांबळे | संदर्भ |
| • देव दानवा नरे निर्मिले! | डॉ. अनिल गांधी | माहितीपर |
| • पुट मोअर टाइम ऑन युवर साइड | डॉ. यान यागर | अनुवादित |
| • पालवी | पालवी अकोलकर | आठवणी |
| • सप्तरंगी लढवय्ये | अँड्रिया हिराता | कादंबरी |
| • काय बोलावं आणि केव्हा शांत राहावे? | राकेश गोधवानी | व्यक्तिमत्त्व विकास |
| • जीवका | मालविका कपूर | कादंबरी |
| • वैद्य, हकीम आणि डॉक्टर | डॉ. संजय शर्मा | आरोग्य |
| • सात्त्विक रेसिपी (पाककृती) | अनुपमा शुक्ला | पाकशास्त्र |
| • तुझी तुला निरामयता | सोनिया मकवाणी | व्यक्तिमत्त्व विकास |
| • बालसंगोपनाचे गुरुमंत्र | रिधी डुंगुरसी | पालकत्व |

## मानवी स्वभाव, संवेदना आणि काळानुसार बदलणाऱ्या नात्यांना स्पर्श करणारे खास कथासंग्रह.




**तनहाई**

माधुरी तळवलकर

किंमत : २६०/- (पृष्ठ संख्या २१६)




**गुंता**

डॉ अनघा केसकर

किंमत : २२५/- (पृष्ठ संख्या १७१)




**अल्याड पल्याड**

सुषमा पेंण्ढरकर

किंमत : २८०/- (पृष्ठ संख्या २२४)




**दान**

डॉ अनघा केसकर

किंमत : २२५/- (पृष्ठ संख्या १६९)




**जाणता अजाणता**

योगिनी वेंगुर्लेकर

किंमत : २२५/- (पृष्ठ संख्या १७८)




**स्वान्तसुखाय**

ज्योती कानेटकर

किंमत : २२५/- (पृष्ठ संख्या १७६)

### *Bank Details for Online Payment Transfer*

Bank Name : **ING - Kotak Mahindra Bank Ltd.**
Account Name : **Vishwakarma Global Education Services Pvt. Ltd.**
Current A/C No. : 509011036603
IFSC Code : KKBK0001769
Branch : F.C. Road, Pune.

---

Bank Name : **Bank of Maharashtra**
Account Name : **Vishwakarma Global Education Services Pvt. Ltd.**
Current A/C No. : 20097715111
IFSC Code : MAHB0000001
Branch : Bajirao road, Pune.

## Our Distribution Network

**Maharashtra**

PUNE | MUMBAI | KOKAN | MARATHWADA
WESTERN - NORTH MAHARASHTRA | VIDARBH
All DISTRICT & TALUKAS COVERED

**National**

DELHI | BANGALORE | MUMBAI | KOLKATA
CHENNAI | GOA | BELGAUM
PRAKASH BOOK DISTRIBUTORS

• 200+ Book Stores all across Maharashtra • 100+ Book Stores outside Maharashtra by 2017
• Direct sales at various university

## Online Distribution

**Domestic-**

www.vpindia.co.in
flipkart
SHOPCLUES.com
Paytm
rediff BOOKS
BOOKGANGA
amazon.in
PUSTAK MANDI

**International-**

Through Multiple INGRAM Distribution Channels like

amazon.com
BARNES & NOBLE BOOKSELLERS
booktopia
Bertrams
Gardners




## Trade Inquiry

**Uttam Patil**
91 6868 22 01

**Mahendra Mahadik**
91 6868 22 02

**Shivling Kore**
91 6868 22 09

**Manoj Sinhababu (kolkatta)**
0814933 40 20

**Sanjeev Kumar (Delhi)**
098 1872 81 83

**Ketan Sonaskar (Mum./Guj.)**
91 6868 22 06

## *Social Media Presence*

www.facebook.com/VishwakarmaPublications
blog.vishwakarmapublications.com/
www.twitter.com/VPBooks
www.pinterest.com/vpindia/
www.linkedin.com/company/vishwakarma-publications
plus.google.com/+VpindiaCoInvishwakarma-publications


**(A Unit of Vishwakarma Global Education Services Pvt. Ltd.)**
**Reg. Office:** Shree Mangal building, 1st Floor, 251, Budhwar Peth, Shivaji Rd., Opposite Bank of India, Near City Post Office, Pune: 411002, Maharastra, India. **Readers Care No.:** 9168682200
**Email:** info@vpindia.co.in **e-STORE:** www.vpindia.co.in **Website:** www.vishwakarmapublications.com